जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०८/०२/२०२४

## दि.०७/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे ४१/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ७० वर्षे,रा.चिंचवड गाव,पिंपरी चिंचवड,पुणे |
| **आरोपीत** | १.अमित नाना चव्हाण,वय २७ वर्षे,रा.ससानेनगर,हडपसर,पुणे २.नेहा बबन सोनवणे,वय २० वर्षे,रा.निगडी ओटा स्किम,निगडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०७/०२/२०२४ रोजी ०५/२० वा. छत्रपती शिवाजी ब्रिजवर,पुणे मनपा शिवाजीनगर पुणे चिंचवडगावकडे जाणा-या पीएमपीएमएल बस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे उजव्या हातातील १,३०,०००/- रू किंमी सोन्याची बांगडी कटरच्या सहाय्याने तोडुन,ती हातातुन हिसकावुन घेऊन बांगडीसह पळुन जात असताना,बस मधील कंडक्टरने दोन्ही दरवाजे बंद करून बस शिवाजीनगर पोलीस चौकी येथे घेऊन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अजित बडे ८२७५४५२३८६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे ४७/२०२४,भादविक ३०७,५०४ |
| **फिर्यादी** | एक महीला,वय-३५ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपीत** | टरम ऊर्फ रोहित पालके,वय-४४ वर्षे,रा.कॅम्प,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०२/२०२४ रोजी रात्री १२/०५ वा.कुमार प्रॉपरटीजच्या समोर थाऊजंड ओक चौका जवळील फुटपाथवर,कॅम्प,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा ओंकार मोहन अडागळे,वय-१८ वर्षे,रा.नवीन म्हाडा,हडपसर सूरक्षानगर,हिंगणे मळा,हडपसर,पुणे हा फिर्यादी यांना त्यांचे राहते घरी नेण्यासाठी आला असता,यातील नमुद इसम याने ओंकार यास शिवीगाळ करून,ये चल इधरसे,नही तो जान से मार दुंगा तुजे साले असे म्हणुन ओंकार यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे जवळील धारधार हत्यार काढुन,ओंकार याचे छातीच्या खाली डाव्या बाजुला वार करून,त्यास गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेंद्र कांबळे ७२४९००८००८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे १२१/२०२४,भादविक ४५४,३८०,५११ |
| **फिर्यादी** | मारूती थिटे,वय ५९ वर्षे,रा.कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०२/२०२४ रोजी ०१/१३ वा. फ्लॅट नं.५०६,फेज नं.१,मंगलम सोसायटी,सोपानकाका नगर,गुजरवाडी रोड,कात्रज,पुणे येथे |

**तपशिल** यातील फिर्यादी यांची हया घरातील कपडे सुकत घालण्यासाठी राहते घराला कुलुप लावून राहते टेरेसवर गेली असताना,कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे राहते घराचे कुलुप तोडून घरात प्रवेश करून,१,४६,२५०/- रू किचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले. तसेच नमुद
कालावधी मध्ये सदर चोरटयाने १)फिर्यादी यांचे बिल्डींग मधील महेंद्रसिंग परमार,रा.फ्लॅट नं. ५०१ या फ्लॅटचे २)हर्षल ढमाले या दोन्ही घराचे कुलुप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे ३)फिर्यादी यांचे घराचे जवळ राहणारे राकेश चौधरी,वय-२७ वर्षे,रा.फ्लॅट नं. १०२,बि विंग,ओरनेस्ट बिल्डींग,गुजरवाडी रोड,गणेश चौक,कात्रज,पुणे ४)हर्षल अनिकेत ढमाले,वय २४ वर्षे,रा. फ्लॅट नं.एस-१,बि-विंग,ओरनेस्ट बिल्डींग,गणेश चौक कात्रज,पुणे ५) दिलीप ज्ञानोबा फणसे,वय ३८ वर्षे,रा.फ्लॅट नं.एस-२,ए-विंग ओरानेस्ट बिल्डींग,गुजरवाडी रोड,गणेश चौक,कात्रज,पुणे यांचे दोन्ही बंद घराचे कुलुप तोडून त्यांचे घरातील २,३७,५००/- रु किचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण ३,८३,७५०/- रु किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. धिरज गुप्ता ९८५०८२०३०७

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** लोणी-काळभोर पो स्टे ८७/२०२४,भादविक ३२४,३२३,४२७,५०४,५०६,१४३,१४७,१४९

**फिर्यादी** नागेश औरादे,वय-२३ वर्षे,रा.कदमवाक वस्ती,पुणे

**आरोपीत** तीन इसम व त्याचे इतर ०३ ते ०४ इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०६/०२/२०२४ रोजी २०/०० वा.ते २०/३० वा.चे दरम्यान निलेश ऑप्टीकल,माई हाईट्स, कदमवाक वस्ती,ता.हवेली,जि.पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे निलेश ऑप्टीकल चष्म्याचे दुकानात हजर असताना,फिर्यादी यांनी नमुद इसमांना त्यांनी घेतलेल्या चष्म्याचे राहिलेले पैसे मागीतल्याचा राग धरुन,त्यांनी बेकायदेशीर रित्या गर्दी जमवुन,फिर्यादी व ऋषिकेश पवार यास हाताने व काठीने मारहाण करुन,चष्म्याचे दुकानाचे नुकसान करून,त्यांना शिवीगाळ,दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. धायगुडे ८८८८८२००२१

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे २५२/२०२४,भादविक ३५२,५०४,५०६(२),आर्म ॲक्ट कलम ३०

**फिर्यादी** एक नागरीक,वय २७ वर्षे,रा.विहार आळी,हडपसर गाव,पुणे

**आरोपीत** एक इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०७/०२/२०२४ रोजी १९/१५ वा.शिवसेना भवन चौकाचे जवळ,माळवाडी हडपसर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचे मित्रासह मोटार सायकलवरून ॲमनोरा मॉलचे पाठीमागील बाजुने मगरपट्टा माळवाडी रोडने हडपसर गाव येथे जात असताना,शिवसेना भवन चौकाचे जवळ फिर्यादी यांचे दुचाकीचा याचे दुचाकीस धक्का लागल्याचे कारणावरुन,त्याने फिर्यादी व त्यांचे सहकारी यांचेशी भांडण करुन,फिर्यादीचे अंगावर धावुन येवुन,त्याने स्वतःचे ताब्यातील परवाना असलेली पिस्टल फिर्यादीचे दिशेने रोखुन,फिर्यादी व त्यांचे मित्रांना माझ्या नादी लागु नका, एकेकाला येथेच गोळ्या घालीन असे म्हणुन शिवीगाळ करून,जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** सहा.पो.फौज. एस.व्ही.लोणकर ९७६७६८३०६१

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे २४९/२०२४,भादविक ३७९

**फिर्यादी** एक महिला,वय ४३ वर्षे,रा.पाटस,ता.दौंड,जि.पुणे

**आरोपीत** अज्ञात (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ३१/०१/२०२४ रोजी सकाळी ०४/३० वा. हडपसर भाजी मंडई,पुणे येथे

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने स्वारगेट ते हडपसर भाजी मंडई असा प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील हॅण्ड पर्स मधील ६०,०००/- रुपये किचे सोन्याचे मंगळसुत्र पर्स मधुन काढुन चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, एम.जी.सकट ९२८४३३३८२३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**